मुंबई उपनगर जिल्हा

**जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी**

प्रसिद्धी माध्यम कक्ष

दूरध्वनी क्र. :- ०२२-२६४० ११५६, ई-मेल संपर्क :- mumbaisuburbanmediacell@gmail.com

जा.क्र. १३१ /प्रसिद्धी माध्यम/प्रेस नोट /२०१९, २७/०४/२०१९

प्रेस नोट

# मतदान केंद्रात जाताना मतदारांना भ्रमणध्वनी नेण्यास परवानगी नाही

## मा. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार मतदारांना आवाहन

मुंबई, २७ एप्रिल २०१९ : **मा. भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार मतदान केंद्रात भ्रमणध्वनी संच (Mobile / Cellular Phone) आणण्यास व वापरण्यास निर्बंध घालण्यात आले आहेत. तरी मुंबई उपनगर जिल्ह्यात येत्या सोमवारी, म्हणजेच दिनांक २९ एप्रिल २०१९ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ या दरम्यान होणा-या मतदान प्रक्रियेमध्ये सहभाग नोंदविण्यासाठी येताना मतदारांनी त्यांच्या सोबत भ्रमणध्वनी आणू नयेत.**

**तरी मुंबई उपनगर जिल्ह्यातील सर्व मतदारांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी मतदान प्रक्रियेत सहभाग नोंदविण्यासाठी मतदान केंद्रात येताना सोबत भ्रमणध्वनी संच असणार नाही, याची परिपूर्ण दक्षता घ्यावी.**

===